# १६ लाखांचे दागिने पळविणारा अटकेत

नांदेड, दि. ६ (प्रतिनिधी)- वसंतनगर येथे चोरट्यांनी घर फोडून १६ लाख २८ हजार रुपयांचे ३२ तोळे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना १९ नोव्हेंबर रोजी घडली होती. या घटनेतील आरोपींना शोधण्यास शिवाजीनगर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकास यश आले असून, पोलिसांनी एका आरोपीस अटक करून त्याच्याकडून १५ लाख १० हजार रुपये किमतीचे ३० तोळे सोने जप्त केले आहे.

वसंतनगर येथील भाविक तिरुपती येथे दर्शनासाठी गेले होते. तेव्हा चोरट्यांनी घरातील ३२ तोळे सोने लुटून नेले. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाच्या अधिकाऱ्यांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासून राजू बाबुराव गायकवाड (रा. महेबूबनगर) यास ताब्यात घेतले असता त्याने गुन्हा केल्याचे कबूल केले. पोलिसांनी त्याच्याकडून सोन्याच्या पाटल्या, बांगड्या, तोडे, नेकलेस, मिनी गंठण, बिनले, सोन्याची साखळी, तीन अंगठ्या, मंगळसूत्र, गंठण, कर्णफुल असे एकूण ३० तोळे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. त्याचबरोबर चांदीचे पाच तोळ्यांचे पैजन असा एकूण १५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, देविदास सिंगल, शेख अजहर, लिंबाजी राठोड, अंकुश लंगोटे, दत्ता वडजे, बाळकृष्ण मुरकुटे यांनी पार पाडली.

## ३० तोळे सोने जप्त

दै. सत्यप्रभा दि. 07-12-23

# ३० तोळे दागिन्यांसह चोरट्यास अटक

## शिवाजीनगर पोलिसांची कामगिरी : सीसीटीव्ही फुटेजवरून ठोकल्या बेड्या

**नांदेड, दि. ६ :** कुलुपबंद घर फोडून चोरी केलेल्या १६ लाख २८ हजार रुपयांचे ३० तोळे सोन्याच्या दागिन्यांसह चोरट्यास मोठ्या शिताफीने पकडण्यात शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला यश आले आहे. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी आज पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले, की शहरातील वसंतनगर येथील कुटुंब घराला कुलुप लावून तिरुपती येथे गेले होते. ही संधी साधून चोरट्याने कुलुप तोडून घरातील १६ लाख २८ हजारांचे सोन्याचे दागिने चोरुन नेले होते. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी या घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्ही कॅमेराच्या फुटेजची



पाहणी केली. त्यामध्ये संशयित दिसला. तिरुपती येथून परत आल्यानंतर तक्रारदाराने २४ नोव्हेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून >> पान दोनवर